नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०२/२०२५ (गुरूवार) दुपार

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक /उत्खनन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद दोन ट्रक,जेसीबी सह ५१ लाख २० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त पारशिवणी पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक २६/०२/२०२५ रोजी पारशिवणी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पेट्रोलींग केली आणि खालील प्रमाणे कारवाई केली.

१. पारशिवणी पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मौजा डोरली येथे एक ट्रक क्रमांक एम.एच .४० बी.जी. ६०२१ हे वाहन संशयीतरित्या मिळुन आले असता पोलीसांनी वाहन चालकाला इशारा करून वाहन थांबविण्यास सांगितले परंतु वाहन चालक, वाहन रोडच्या कडेला लावुन आंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती मिळुन आली परंतु कोणताही परवाना वाहनात मिळुन आला नाही. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती १०,०००/रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच .४० बी.जी. ६०२१ किंमती **१६,००,०००**/—रूपये असा एकुण १६,१०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

पाहीजे आरोपी ट्रक क्रमांक एम.एच .४० बीजी. ६०२१ चा **चालक आणि मालक** यांच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज.म. संहीता सहकलम ४,२१ खान खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

२. पारशिवणी पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मौजा पिपळा शिवार ,पेंच नदीच्या काठावर एक ट्रक आणि जेसीबी दिसुन आल्याने पोलीसांनी जवळ जावुन पाहीणी केली असता तेथील आरोपी पोलीसांना येतांना पाहुन त्यांच्ये वाहन जागीच सोडुन घटनास्थळावरून पळुन गेले. घटनास्थळावर पोलीसांना ट्रक क्र.एम एच ३४ ए.व्ही. १०२१ आणि जेसीबी क्र. एम.एच. ४० बी.ई.

४३०६ मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक क्र. एम. एच. ३४ ए. व्ही. १०२१ या वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती मिळुन आली वाहनात परवाना मिळुन आला नाही. वाहन सोडुन आरोपी पळुन गेल्याने सदर रेतीचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याचे पोलीसांनी खात्री झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती १०,०००/रूपये आणि २) ट्रक क्र. एम. एच.३४.ए.व्ही.१०२१ किंमती **१५,००,०००**/—रूपये , ३) जेसीबी क्र. एम.एच ४० बी. ई. ४३०६ किंमती **२०,००,०००**/—रूपये असा एकुण ३५ ,१०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

पाहीजे आरोपी ट्रक क्र. एम. एच. ३४ ए.व्ही. १०२१ चा **चालक आणि मालक** तसेच जेसीबी क्र. एम.एच ४०.बी.ई. ४३०६ चा चा **चालक आणि मालक** यांच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज.म. संहीता सहकलम ४,२१ खान खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**दोन्ही कारवाईत एकुण ५१ लाख २० हजारांचा मुददेमला जप्त करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर